# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University**

सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆ : ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०


**परीक्षा व मूल्यमापन मंडळ ● Board of Examinations and Evaluation**

**जा.क्र.पुअहोसोविसो/पवमूवि/मानवविज्ञान/२०२२/** 1182 **दिनांक :** 2 AUG 2022

प्रति,
**प्राचार्य/प्राचार्या/संचालक,**
विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालये/सर्व शैक्षणिक संकुल विद्यापीठ परिसर,
पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.

**विषय :** M.A. Part-II, Sem-IV मधील Dissertation चे गुण विद्यापीठास सादर करणेबाबत...
**संदर्भ :** १. अभ्यासमंडळे विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांचे पत्र जा.क्र.पुअहोसोविसो/अमंवि/२०२२/५०१०, दिनांक ०४/०७/२०२२.
२. संगणक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांचेकडून प्राप्त झालेली दिनांक २८/०७/२०२२ रोजीची अंतर्गत कार्यालयीन टिपणी.

महोदय,

उपरोक्त संदर्भ क्र. १ येथील पत्रान्वये अभ्यासमंडळे विभाग, प्रस्तुत विद्यापीठ यांनी एम.ए. भाग-२, सत्र-४ मधील HCP 4.3 Dissertation (शोध प्रबंध लेखन) या पेपरच्या मूल्यांकनासंबंधित नियमावली व मार्गदर्शक सूचना विद्यापीठ संलग्नित सर्व महाविद्यालयांना व विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक संकुलांना कळवून सदर नियमावली अवलोकनी घेवून पुढील कार्यवाही करणेबाबत सूचित केले आहे. सुलभ संदर्भासाठी संदर्भिय पत्र सोबत जोडण्यात आले असून कृपया अवलोकन व्हावे. पत्रासोबत जोडण्यात आलेल्या Dissertation (शोध प्रबंध लेखन) संदर्भातील मार्गदर्शक तत्वे व नियमावलीमधील अनुक्रमांक (ब)(४) मधील तरतुदीनुसार Dissertation (शोध प्रबंध लेखन) च्या कामाला विद्यार्थ्याला मिळालेले ८० पैकी गुण विद्यापीठाला सादर करावेत असे नमुद करण्यात आलेले आहे.

त्याअनुषंगाने विविध महाविद्यालयांकडून प्रस्तुत कार्यासनास सदरील गुण विद्यापीठास कसे सादर करावे? ऑनलाईन किंवा ऑफलाईन करावे? याबाबत विचारणा होत होती.

यास्तव संदर्भ क्र. २ च्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, M.A. Part-II, Sem-IV मधील Dissertation चे गुण विद्यापीठास सादर करण्यासाठी आपल्या लॉगीनमध्ये लिंक उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तरी सदरील गुण आपल्या लॉगीनमधून विद्यापीठाकडे एम.ए.च्या सत्रनिहाय परीक्षा संपण्याच्या अगोदर पाठवून विद्यापीठास परीक्षेच्या व निकालाच्या कामामध्ये सहकार्य करावे हि विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

31/07/22

**( डॉ. शिवकुमार गणपूर )**
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
NAAC Accredited-2022
'B ++' Grade (CGPA 2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

**Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur**

केगाव, सोलापूर-४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दूरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११४ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००

संकेतस्थळ : http:su.digitaluniversity.ac.in ई-मेल : registrar@sus.ac.in bos@sus.ac.in

अभ्यासमंडळे विभाग

जा.क्र.:पुअहोसोविसो/अमंवि/२०२२/ 5010 दिनांक: 04 JUL 2022

प्रति

१. मा.प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये

२. मा. संचालक, विद्यापीठ परिसर सर्व शैक्षणिक संकुले

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

विषय: **Dissertation (शोध प्रबंध लेखन) या पेपरच्या मूल्यांकनासंबंधित नियमावली व मार्गदर्शक सूचनांबाबत..**

संदर्भ : अभ्यासमंडळे विभागाची दि.२४/०६/२०२२ रोजीची मान्य टिपणी.

महोदय,

मानवविज्ञान विद्याशाखा अंतर्गत एम.ए. भाग-२ सत्र ४ HCP 4.3 Dissertation या पेपर बाबत नियमावली व मार्गदर्शक सूचना पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या आराखडयामध्ये नमूद नव्हत्या. सबब, सदर पेपरच्या मूल्यांकना संबंधित नियमावली तयार करणेकामी तज्ज्ञ समिती गठित करून, सदर समितीकडून या पेपरकरिता नियमावली व मार्गदर्शक सूचना तयार करून घेण्यात आल्या आहेत.

एम.ए. भाग-२ सत्र ४ HCP 4.3 Dissertation या पेपर बाबत नियमावली व मार्गदर्शक सूचना या सोबत जोडून पाठवित आहोत. तरी सदर नियमावली अवलोकनी घेवून उपरोक्त नमूद पेपर संदर्भात सर्व संबंधित महाविद्यालयांनी व संकुलांनी कार्यवाही करावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

(डॉ. सु. कि. पवार)
प्र.कुलसचिव

सोबत: वरील प्रमाणे.

23/06/2022

## Dissertation (शोध प्रबंध लेखन): मार्गदर्शक तत्त्वे व नियम

एम.ए. भाग २ च्या अभ्यासक्रमाच्या आराखड्यातील सत्र ४ मध्ये आवश्यक पेपर HCP 4.3 Dissertation (शोध प्रबंध लेखन) विद्यार्थ्यांना सादर करणे आवश्यक आहे. विद्यापीठाच्या दिनांक १९ जुन, २०२२ च्या पत्रानुसार समितीच्या तिन्ही सदस्यांनी परस्परात विचार विनिमय करून Dissertation (शोध प्रबंध लेखन) याबाबत खालीलप्रमाणे मार्गदर्शक तत्त्वे व नियम तयार केले आले आहेत.

**अ) मार्गदर्शन तत्त्वे:**

१) आपल्या विभागातील शिक्षकांबरोबर चर्चा करून Dissertation (शोध प्रबंध लेखन) चे काम करण्यासाठी प्रथम विषय निश्चित करावा.

२) त्यानंतर शोध प्रबंध लेखनाची रुपरेषा तयार करून आपल्या विषयाच्या शिक्षकांना दाखवावी व दुरुस्ती करून घ्यावी.

३) Dissertation चे लेखन करत असताना पहिले प्रकरण हे प्रस्तावना व संशोधन पद्धती असे करावे.

४) त्यानंतर दुसरे, तिसरे, चौथे अशी प्रकरण रचना आपण निवडलेल्या विषयाच्या आधारे तयार करुन त्याचे लेखन करावे.

५) शेवटचे प्रकरण निष्कर्ष असे करावे व सदर प्रकरणात संशोधनांती हाती असलेले निष्कर्ष नोंदवावेत.

६) त्यानंतर संदर्भसुची व त्याखाली परिशिष्टे जोडावीत.

**ब) नियम:**

१) Dissertation (शोध प्रबंध लेखन) चे काम विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर शिक्षणाच्या चौथ्या सत्रात विद्यापीठाच्या परीक्षा सुरू होण्याच्या पुर्वी किमान दहा दिवस पुर्ण करून आपल्या विषयाच्या विभागात जमा करणे आवश्यक आहे.

२) त्यानंतर शोध प्रबंध लेखनाचे काम पुर्ण केलेल्या विद्यार्थ्यांची अंतर्गत २० गुणासाठी मौखिक परीक्षा आयोजित करावी. सदर मौखिक परीक्षेसाठी एक बहिस्थ: परीक्षक व एक अंतर्गत परीक्षकाची नेमणुक ~~करावी.~~ संबंधित महाविद्यालय/संकुल यांनी करावी.

३) Dissertation (शोध प्रबंध लेखन) च्या मौखिक परीक्षाला विद्यार्थ्यांना मिळालेले २० पैकी गुण इतर चार पेपर बरोबर विद्यापीठाच्या वेबसाईटला अपलोड करावेत.

४) Dissertation (शोध प्रबंध लेखन) च्या कामाला मिळालेले ८० पैकी गुण विद्यापीठाला सादर करावेत.

५) Dissertation च्या दोन प्रती महाविद्यालयातील विषय विभागात जतन करून ठेवाव्यात.

| | | |
|---|---|---|
| **मा. डॉ. एस.एन. सलवदे**<br>**स.अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा** | **मा. डॉ. व्ही. पी. शिखरे**<br>**प्र.अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा** | **मा. डॉ. डी.एस. तिकटे**<br>**प्र.अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा** |

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर